ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख ३ सप्टेंबर, १९५८ अंक ३६

## विविध माहिती

**नागपूरमधील विडीचे कारखाने**—मुंबई सरकारनें विदर्भा-मधील विड्याच्या कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांना किमान वेतन देण्यासंबंधीचा हुकूम काढल्यानंतर बहुतेक सर्व कारखाने मालकांनीं बंद केले होते. आतां नागपूरमधील १५ कारखान्यांनीं सरकारचा हुकूम मानला असून कारखाने पुन्हा चालू केले आहेत. विदर्भाच्या इतर भागांतील कारखानेहि पुन्हा सुरू करण्यांत येत आहेत.

**सार्वत्रिक निवडणुकींतील खर्च**—गेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कामाकाजानिमित्त १९५८ च्या जानेवारी महिन्यापर्यंत मुंबई सरकारनें ८१ लाख, ९८ हजार रुपये खर्च केले अशी माहिती मुख्यमंत्री श्री. चव्हाण ह्यांनीं विधान सभेंत सांगितली. त्यापैकी ५० टक्के खर्च मध्यवर्ती सरकारनें सोसावयाचा आहे, असा खुलासाहि त्यांनीं केला.

**ब्रिटन व जर्मनीकडून मिळणारी मदत**—परदेशी चलनाच्या भारताच्या तांतडीच्या गरजा भागविण्यासाठी ब्रिटन व पश्चिम जर्मनी मोठी मदत करतील असा संभव आहे. ब्रिटनकडून सुमारें २१ कोटि डॉलर्स आणि जर्मनीकडून १० कोटि डॉलर्स मिळण्याची शक्यता आहे. जपानकडूनहि पुढील मार्चपर्यंत कांहीं मदत मिळण्याचा संभव आहे.

**दोन स्वतंत्र भागांची बोट**—अमेरिकेंतील बोटी बांधणाऱ्या एका कंपनीनें असें जाहीर केलें आहे कीं दोन संपूर्णपणें स्वतंत्र भाग असलेली बोट बांधण्यांत येणार आहे. ह्यांपैकी एक भाग पाण्याखालीं बुडालेला असेल व त्यांत बोटीचें एंजिन असेल. दुसरा भाग पहिल्यावर असेल आणि तो पाण्यापासून पूर्णपणें अलिप्त असेल. वरच्या भागांत प्रवाशांची सोय करण्यांत येईल.

**पाटबंधाऱ्यांचें पाणी**—गोध्रा येथें सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे सरकारी व बिनसरकारी लोकांची एक बैठक भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींत पंचमहाल जिल्ह्यांतील शेतकऱ्यांत पाटबंधाऱ्यांचें पाणी वापरण्याबद्दल प्रचार करण्याचें ठरविण्यांत आलें. शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकरी पाटबंधाऱ्यांच्या पाण्याचा पुरेसा उपयोग करीत नाहींत, असें बऱ्याच ठिकाणीं आढळून आलें आहे.

**अमेरिकेचा रशियावर दावा**—हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टांत अमेरिकेनें रशियावर नुकसानभरपाईचा दावा लावला आहे. १९५४ च्या सप्टेंबर महिन्यांत जपानच्या समुद्रांत रशियानें एक अमेरिकन विमान पाडलें होतें. त्याबद्दल नुकसानभरपाई म्हणून १३.३ लाख डॉलर्सची मागणी दाव्यांत करण्यांत आली आहे.

**कोळशाची अधिक निर्यात**—परदेशीय चलनाची प्राप्ती करून घेण्यासाठी भारत पूर्वी ठरल्यापेक्षा ५ लाख टन उत्तम प्रतीचा अधिक कोळसा निर्यात करणार आहे, अशी माहिती लोकसभेंत मध्यवर्ती सरकारचे खाणी-मंत्री श्री. स्वरण सिंग ह्यांनीं सांगितली. भारताच्या कोळशाच्या उत्पादनांत वाढ होत आहे.

**सक्तीचें शारीरिक शिक्षण**—भारताच्या शिक्षणसंस्थांत शिकणाऱ्या १९ ते २२ वर्षें वयाच्या सर्व विद्यार्थ्यांना सक्तीचें शारीरिक शिक्षण देण्याची एक योजना मध्यवर्ती सरकार तयार करीत असल्याची वार्ता आहे. विद्यार्थ्यांमधील वाढत्या बेशिस्तीवर उपाय म्हणून हा उपक्रम करण्यांत येणार आहे. योजनेचा तपशील अद्याप ठरलेला नाहीं.

**छायाचित्रांचें साहित्य**—छायाचित्रें घेण्याची फिल्म, कांचा व इतर साहित्य ह्यांच्या आयातीवर कडक निर्बंध असल्यानें त्यांच्या किंमती वाढल्याच्या तक्रारी आहेत. त्या विचारांत घेऊन मध्यवर्ती सरकार निर्बंध ढिले करण्यासंबंधी विचार करीत आहे, असें उद्योग व व्यापारमंत्री श्री. शास्त्री ह्यांनीं सांगितलें आहे.

**प्लॅस्टिकच्या मालाची वाढती निर्यात**—भारतांतून निर्यात करण्यांत आलेल्या प्लॅस्टिकच्या मालाची किंमत १९५७–५८ सालीं ७० टक्क्यांनीं वाढली. १९५७–५८ सालीं १२.३१ लाख रुपये किंमतीचा प्लॅस्टिकचा माल निर्यात करण्यांत आला. १९५६–५७ सालीं सुमारें ७ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात झाला होता.

**शिक्षण संस्थेला देणगी**—अकोला येथील एक लक्षाधीश व्यापारी श्री. राधाकिसन ह्यांनीं वऱ्हाड एज्युकेशन सोसायटीला ५०,००० व २५,००० रुपयांच्या दोन देणग्या दिल्या आहेत. पहिली देणगी अकोला येथें सायन्स कॉलेज काढण्यासाठी आहे. वरील संस्थेतर्फे एक लॉ कॉलेजहि चालविण्यांत येत आहे.

**कागदाच्या कारखान्याची यंत्रसामुग्री**—भारतामधील दोन उद्योगपतींकडून कागद तयार करण्याच्या कारखान्याची यंत्रसामुग्री तयार करण्याबद्दल सरकारकडे योजना आल्या आहेत अशी माहिती लोकसभेंत देण्यांत आली. ह्या योजनांबद्दल कांहीं परदेशी कारखानदारांकडूनहि विचारणा करण्यांत आली आहे.

**कच्च्या फिलमचा कारखाना**—उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना उभारण्याची योजना नॅशनल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें आंखली असून तिला भारत सरकारनें मंजुरी दिली आहे. कारखान्याच्या उभारणींत पूर्व जर्मनींतील ' आगफा ' ह्या सुप्रसिद्ध कंपनीचें सहकार्य घेण्याचें ठरलें आहे.

**अलास्काचा विकास**— अमेरिकेच्या ४८ संस्थानांत अलास्का ह्या नव्या संस्थानाची नुकतीच भर पडली आहे. विरळ वस्तीच्या व बहुशः ओसाड असलेल्या ह्या भागांत कोळशाच्या खाणी व युरेनिअमच्या खाणी सांपडण्याचा संभव आहे. सध्या अमेरिकन शास्त्रज्ञांची एक तुकडी तेथें भूगर्भीय संशोधन करीत आहे.

**भारताच्या इतिहासाचीं साधनें**—भारताच्या' पुराणवस्तु खात्यांतील एक अधिकारी अमेरिकेला गेला आहे. भारतीय इतिहासाबद्दल अमेरिकेंत उपलब्ध असलेल्या साधनांपैकीं कांहीं कागदपत्रांची तो निवड करणार आहे. अमेरिकेनें गव्हासाठी दिलेल्या कर्जाच्या व्यवहारांतून त्याच्या दौऱ्याचा खर्च करण्यांत येणार आहे.

**जपानमधील बोटी बांधण्याचा धंदा**—जपानमधील बोटी बांधण्याच्या कारखान्यांनी युद्धपूर्व कालाप्रमाणें मोठ्या प्रमाणावर बोटी बांधण्याचें ठरविलें आहे. नव्या कार्यक्रमाप्रमाणें १,००,००० टन वजनाच्या दोन तेलवाहू बोटी बांधण्यांत येणार आहेत. त्याशिवाय जगांत सर्वांत मोठी ठरेल अशीहि एक तेलवाहू बोट बांधण्यांत येणार आहे.

**तज्ज्ञांच्या सल्ल्याची किंमत**:— पाकिस्तानांत काम करीत असलेल्या प्रत्येक अमेरिकन तज्ज्ञासाठी दरसाल २५,००० डॉलर्स व २४,००० पाकिस्तानी रुपये खर्च येतो असा हिशोब 'डॉन' ह्या वृत्तपत्रानें प्रसिद्ध केला आहे. प्रत्येक तज्ज्ञासाठी दरमहा १२,००० रुपये खर्चावे लागतात; इतकेंहि करून ते आपल्या कामास योग्य असतातच असें नाहीं.

**भारत-झेकोस्लोव्हाकिआ करार**— बिहारमधील रांची शहराजवळील एका गांवीं धातूंची ओतशाळा काढण्यांत येणार आहे. ही ओतशाळा काढण्याबद्दल भारतानें झेकोस्लोव्हाकियाशी करार केला आहे. रशिआच्या मदतीनें भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा जो कारखाना उभारण्यांत येणार आहे त्याची ही प्राथमिक तयारी आहे.

**देशसेवेची अपुरी किंमत**—१९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीमध्यें भाग घेतलेल्या एका कार्यकर्त्यानें भारत सरकारच्या अर्थखात्याकडून आलेला १०० रुपयांचा चेक परत केला आहे. आपण केलेल्या देशसेवेसाठी निदान ५,००० रुपये द्यावे, अशी त्याची मागणी होती. आपल्या सेवेचें मोल इतकें कमी करण्यांत आलेलें पाहून त्याला उबग आला.

**राजकीय पुढाऱ्यांची बँकेंतील शिल्लक**—पश्चिम पाकिस्तानचे मुख्य प्रधान ह्यांनी अशी सूचना केली आहे कीं, पाकिस्तान स्वतंत्र झाल्यावर जे लोक झपाट्यानें श्रीमंत झाले, त्यांच्या, त्याचप्रमाणें सर्व पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांच्या व वरिष्ठ नौकरांच्या नांवावर बँकांतून जमा असणाऱ्या पैशाची चवकशी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत यावें.

**गंगा नदीवरील नवा पूल**—दक्षिण बिहार व उत्तर बिहार ह्यांना जोडणारा गंगेवरील पूल १९५९ च्या मध्याच्या सुमारास म्हणजे ठरल्यापेक्षां ६ महिने आधीं पुरा होईल. हा पूल रेल्वेच्या व वाहनाच्या उपयोगी पडणारा आहे. त्यासाठी १६ कोटी रुपये खर्च येईल. तो पुरा झाल्यावर पूर्व उत्तर प्रदेश व ईशान्य भारत रेल्वे मार्गावर सलग वाहतूक करतां येईल.

सस्तु साहित्यवर्धक कार्यालयाचें
आगामी प्रकाशन
मधुमालतीनुं सौंदर्य
मूळ लेखक :
श्री. बा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादक:
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.






# अर्थ

बुधवार, ता. ३ सप्टेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताच्या धनको राष्ट्रांची बैठक

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशाच्या मार्गांत परदेशीय चलनाची टंचाई ही एक मोठी अडचण आहे. ह्या अडचणीचा परिहार करण्यासाठी काय करतां येईल तें पहाण्यासाठी वॉशिंग्टन येथें भारताच्या धनको राष्ट्रांची एक बैठक नुकतीच भरविली गेली. जागतिक बँकेनें पुढाकार घेऊन अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, जपान व कॅनडा ह्या धनको राष्ट्रांच्या प्रतिनिधींची ही बैठक घडवून आणली होती. भारताला दीर्घ अगर अल्प मुदतीचीं कर्जें कशा पद्धतीनें देण्यांत यावीं ह्यासंबंधीं बैठकींत विचारविनिमय करण्यांत आला. बैठकींत खुद्द भारतानें मात्र भाग घेतला नाहीं. तथापि भारताच्या अर्थखात्याचे चिटणीस श्री. बी. के. नेहरू हे भारताच्या आर्थिक परिस्थितीसंबंधानें लागणारी माहिती पुरवीत होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं २॥ वर्षें अद्याप जावयाचीं आहेत. ह्या अवधींत भारताला १०० कोटी डॉलर्सच्या कर्जाची आवश्यकता आहे. त्यांपैकी निम्म्या रकमेची भारताला तांतडीची गरज आहे. कारण, चालू अर्थवर्षांत जी परदेशांची रक्कम द्यावयाची आहे ती देणें भारताला एरवी शक्य होणार नाहीं. म्हणून ५० कोटी डॉलर्सचें कर्ज ताबडतोब न मिळाल्यास भारताला आपलीं परदेशी देणीं लांबणीवर टाकावीं लागण्याचा संभव आहे. वॉशिंग्टन येथील बैठकींत अंतिम स्वरूपाचे निर्णय घेतले गेलेले नाहींत. तथापि कर्जाच्या हप्त्यांपैकी पहिल्या हप्त्यांची घोषणा सप्टेंबर अखेरपर्यंत करण्यांत येण्याचा संभव आहे. प्रत्येक देश आपआपल्या चलनांत भारताला कर्जाऊ रक्कम देईल आणि ह्या रकमांचा उपयोग करून भारत त्या त्या देशांत आपल्याला लागणारा माल विकत घेईल. जागतिक बँक व अमेरिका ह्या दोघांचीहि भारताला संयुक्तपणें मदत देण्याच्या योजनेविषयीं फार आस्था दिसून येत आहे. अमेरिका ह्या बाबतींत पश्चिम जर्मनीला विशेष गळ घालीत आहे.

---

## कापडाच्या निर्यातींत चीनच्या स्पर्धेचें स्वरूप

भारतामधील सुती कापड आग्नेय आशिआंतील देशांत निर्यात करण्यांत येतें. मलाया, सयाम, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ ह्या देशांना भारतामधील कापड पाठविलें जातें. पण गेल्या कांहीं वर्षांत ह्या देशांत भारतीय कापडाला चीनमधून येणाऱ्या कापडाची जोराची स्पर्धा होऊं लागली आहे. वायद्याच्या सौद्याच्या आकर्षक अटी, चटाओढीच्या किंमती आणि विक्रेत्यांचा जोरदार प्रचार ह्यांच्या साह्यानें चिनी व्यापारी आपला जम बसवीत असून भारताच्या व्यापाऱ्यांना हळुहळू हुसकत चालले आहेत. विशेषत: मलायाच्या बाजारपेठेंत ही स्पर्धा विशेष जाणवूं लागली आहे. गेल्या वर्षापासून मलायांतील बाजारपेठांत भारताचें कापड कमी प्रमाणांत येऊं लागलें आहे. मलायाप्रमाणें आग्नेय आशिआंतील इतर देशांतहि चिनी व्यापारी पाय रोवूं लागले आहेत. ह्या देशांतील आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांना चीन बरींच प्रलोभनें दाखवीत आहे. कोणत्याहि प्रकारचें सुती कापड दुसऱ्या कोणत्याहि कापड निर्यात करणाऱ्या देशापेक्षा १० टक्के कमी किंमतींत देऊं असें त्यांना सांगण्यांत येत आहे. त्याशिवाय वायद्याच्या व्यवहाराच्या करारांत एक सवलतीचें कलम घालण्यांत येतें. ह्या कलमाप्रमाणें करारांत ठरलेल्या किंमतीपेक्षा प्रत्यक्ष माल ताब्यांत देण्याच्या वेळच्या किंमती जर कमी असतील तर आयात व्यापाऱ्यांकडून त्या दरानें किंमत घेण्याची सवड ठेवलेली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून भारताच्या कापडाची ह्या भागांतील निर्यात घटूं लागली आहे. उदाहरणार्थ, मलायांत आयात होणाऱ्या कापडापैकीं ३० टक्के कापड १९५४ सालीं भारतामधून आलेलें होतें. चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत तें १२ टक्क्यांवर आलें आहे. मलाया, ब्रह्मदेश, सयाम, इत्यादि देशांतील व्यापारी चिनी कापडाचा व्यापार अधिक फायदेशीर म्हणून तिकडे वळत आहेत.

---

## कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना

भारतामधील चित्रपटाच्या धंद्याला सध्यां बिकट अवस्थेंतून जावें लागत आहे. कारण, चित्रपट तयार करण्यासाठी लागणारी कच्ची फिल्म भारतांत तयार होत नसल्यानें ती परदेशांहून आयात करावी लागते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणाऱ्या भांडवली मालासाठी आणि अन्नधान्याच्या आयातीसाठी परदेशीय चलनाची अतिशय गरज असल्यानें, चित्रपटासाठी लागणाऱ्या फिल्मसारख्या मालाची आयात करण्यासाठी पुरेसें परदेशीय चलन उपलब्ध होणें अशक्य झालेलें आहे. ही अडचण दूर करण्यासाठी उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला. कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठी अगफा ह्या जर्मन कंपनीच्या तंत्रज्ञांनीं भारतामधील निरनिराळ्या ठिकाणांची पहाणी केली आणि उटकमंड हेंच ठिकाण सर्वांत सोयीचें आहे असा निष्कर्ष काढला. तथापि प्रत्यक्ष कारखाना निघण्यास विलंब लागत आहे. कारण, जरूर त्या यंत्रसामुग्रीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची टंचाई आहे. ह्या कारखान्यासाठी प्रारंभीं सुमारें २ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागणार आहे. ही सर्वच रक्कम भारत सरकारला उपलब्ध करता येणें कठीण असल्यानें अगफा कंपनीनें आर्थिक सहकार्य देण्याविषयींहि सध्यां वाटाघाटी चालू आहेत. तांत्रिक साह्य कंपनीकडून मिळणारच आहे. ह्याच वेळीं भारताच्या निर्यात व्यापारांत घट झालेली दिसून येत असल्यानें अडचणी वाढण्याचीच शक्यता आहे. चालू वर्षाच्या जानेवारी ते जून ह्या सहामाहींत भारतानें २४८ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. गेल्या वर्षाच्या ह्याच सहामाहींतील निर्यात मालाच्या किंमतीपेक्षां हा आंकडा ५५ कोटी रुपयांनीं कमी आहे.

---

## १९५७ मधील औद्योगिक कलह

### मुंबई, मद्रास, प. बंगाल अग्रेसर

औद्योगिक कलहांमुळें कामाचे दिवस फुकट जाण्याचें प्रमाण १९५७ मध्यें २८·७ टक्क्यांनीं घटलें. तसेंच सरकारनें मध्यस्थी केल्यानें या वर्षात निर्माण झालेल्या झगड्यांपैकीं पुष्कळसे झगडे मिटले. भारत सरकारच्या लेबर ब्यूरोनें संकलित केलेल्या आंकडेवारीनुसार, १९५७ मध्यें उद्भवलेल्या औद्योगिक कलहांमुळें एकूण ४९,८२,२२९ कामाचे दिवस फुकट गेले. १९५६ मध्यें ६९,९२,०४० कामाचे दिवस फुकट गेले होते. औद्योगिक कलहांत गोंवल्या जाणाऱ्या कामगारांच्या संख्येच्या प्रमाणांतहि १९५७ मध्यें घट झाली. तथापि, औद्योगिक कलहांच्या संख्येंत मात्र वाढ झाली. १९५६ मध्यें १,२०३ कलह उद्भवले तर १९५७ मध्यें ही संख्या १,२४८ वर गेली. तथापि, औद्योगिक कलह टिकण्याच्या सरासरी कालाचें प्रमाण १९५६ मधील ९·८ दिवसांवरून १९५७ मध्यें ७·८ दिवसांपर्यंत खालीं आलें.

सन १९५७ मध्यें मुंबई, मद्रास आणि प. बंगाल राज्यांत सर्वांत जास्त कलह उद्भवले. केरळ राज्यांतहि पुष्कळ कलह उद्भवले. कामाचे दिवस फुकट जाण्याचें प्रमाण प. बंगाल राज्यांत सर्वांत अधिक, म्हणजे २१ टक्के होतें.

उद्योगधंदेनिहाय फुकट गेलेल्या कामाच्या दिवसांचा विचार करतां 'मॅन्युफॅक्चरिंग' उद्योगधंद्यांत ६० टक्के व मायनिंग ॲण्ड क्वारिंगमध्यें १५·९ टक्के कामाचे दिवस फुकट गेले.

सन १९५७ मध्यें उद्भवलेल्या एकूण औद्योगिक कलहांपैकीं ३/४ कलह ५ दिवसांहून अधिक काल टिकले नाहींत. यांपैकी पुष्कळसे संप तर एक दिवस किंवा त्याहूनहि कमी काळ टिकले. केवळ ७·१ टक्के औद्योगिक कलहच काय ते ३० दिवसांहून अधिक काळ टिकले.

वेतन आणि भत्त्यांवरूनच पुष्कळसे झगडे उद्भवले व वैयक्तिक कारणांवरूनहि कांहीं थोडे झगडे उद्भवले.

सन १९५७ मध्यें ३२ टक्के झगड्यांच्या निकालांत कामगारांना यश मिळालें नाहीं. ३० टक्के झगड्यांत त्यांना यश मिळालें व दुसऱ्या पंधरा टक्के झगड्यांचा निकालांत त्यांना अंशतः यश मिळालें. २० टक्क्यांहून थोड्या अधिक झगड्यांच्या प्रकरणीं कोणताहि अंतिम निर्णय घेण्यापूर्वीच कामगार कामावर हजर झाले.

---

### टिकविलेल्या खाद्य पदार्थांची निर्यात

टिकविलेल्या खाद्य पदार्थांच्या निर्यातीपासून १९५८ च्या पहिल्या चार महिन्यांत भारताला २·५ कोटीहून अधिक रुपये मिळाले. १९५७ मध्यें यापासून एकूण ५·६७ कोटी रुपये मिळाले होते.

एकूण तीसहून अधिक खाद्य पदार्थ निर्यात करण्यांत आले. यांमध्यें खारवलेली, सुकी किंवा धुरी दिलेली मासळी, मासळीपासून तयार केलेले पदार्थ, टिकविलेले भाजीपाले, पीठ, फळांचे रस, मुरंबे, जेली, सुकी फळें, अन्नधान्यांपासून बनविलेले पदार्थ, दुग्ध पदार्थ, मांसार्क आणि मांस-पदार्थ, बेकरी-पदार्थ, इत्यादि खाद्यपदार्थ होते.

हे खाद्यपदार्थ निरनिराळ्या सतरा देशांकडे निर्यात करण्यांत येत असून त्यांपैकीं सिलोन आणि ब्रह्मदेश यांचा अनुक्रमें पहिला व दुसरा क्रम लागतो. तसेंच अमेरिका, इंग्लंड, स्पेन, प. जर्मनी, सिंगापूर, इराक, स्वीत्झर्लंड, मॉरिशस, इटली, जपान, पोर्तुगाल, ऑस्ट्रिया, बेहरीन बेटें, डेन्मार्क आणि ऑस्ट्रेलिया या देशांकडेहि या पदार्थांची निर्यात होते.

### हातमाग कापडाच्या निर्यातींत घट

भारतांतील निरनिराळ्या सुती कापड क्षेत्रांत १९५७ मध्यें ७३५·१ कोटि वार कापड तयार झालें. यांपैकी गिरण्यांत ५३१·७ कोटि वार, यंत्रमागांवर ३०·३ कोटि वार व हातमागांवर १६८·० कोटि वार कापड तयार झालें. नेहमीच्या खादीचें ४१·१७ दशलक्ष वार व अंबर खादीचें १०·९१ दशलक्ष वार उत्पादन झालें.

यंत्रमागासुद्धां गिरण्यांत तयार झालेल्या सुती कापडाची १९५७ मध्यें झालेली निर्यात १९५५ आणि १९५६ मध्यें झालेल्या निर्यातीपेक्षा अधिक परंतु १९५४ मधील निर्यातीपेक्षा कमी होती. १९५७ मध्यें ८४४·९२ दशलक्ष वार सुती कापडाची निर्यात झाली. १९५५ आणि १९५६ मध्यें अनुक्रमें ७४४·२६ दशलक्ष वार व ८१५·४९ दशलक्ष वार सुती कापड निर्यात करण्यांत आलें होतें.

गेल्या चार वर्षांत निर्यात झालेल्या हातमागी कापडाचे आंकडे विचारांत घेतां, १९५७मध्यें ह्या कापडाच्या निर्यातींत घट झाली.

---

### बँक ऑफ भोपाळला बँकिंगचे व्यवहारासाठीं परवाना नाहीं

१९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टानुसार, भोपाळ येथील दि बँक ऑफ भोपाळ लि. ला भारतांत बँकिंगचे व्यवहार करण्यासाठीं परवाना देऊं शकत नसल्याचें रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें त्या बँकेस कळविलें आहे. सदर बँकेस कोठल्याहि प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करतां येणार नाहींत आणि म्हणून या बँकेनें जनतेकडून पैशाच्या ठेवींचा स्वीकार करणें कायदेशीर होणार नाहीं. बँक ऑफ भोपाळच्या ह्या बिगर-शेड्यूल्ड बँकेची स्थापना १९४४ सालची असून तिच्या कारभाराचे आंकडे खालीलप्रमाणें आहेतः—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल : | १२½ लक्ष रुपये |
| रिझर्व्हज् : | ७५ हजार रुपये |
| ठेवी : | १० लक्ष रुपये |
| दिलेलीं कर्जें : | १९½ लक्ष रुपये |

---

### रेल्वे वाहतुकीचे नवे दर

नवे दर १ ऑक्टोबर, १९५८ पासून अंमलांत येतील. त्याच दिनांकापासून पार्सलांच्या वाहतुकीच्या दरांत फेरबदल होईल आणि मालवाहतुकीचे नवे दर आणि पार्सलांचे दर दशमान नाण्यांत दिले जातील.

वाहतुकीच्या प्रचलित पातळीप्रमाणें मालवाहतुकीच्या नव्या दरांपासून दरवर्षी आणखी ९·६ कोटी रुपये उत्पन्न मिळेल असा अंदाज धरलेला आहे. सुधारलेल्या पार्सल दरांपासून दरवर्षी सुमारें आणखी २ कोटी रुपये मिळतील असा अंदाज आहे.

---

### श्री. मुरारजी देसाई, एक सामान्य उतारू

अर्थमंत्री, श्री. मुरारजी देसाई, हे विमानानें मुंबईहून निघालें तेव्हां त्यांनीं कस्टम्सच्या नेहमींच्या तपासण्या आपले बाबतींतहि व्हाव्यात असा आग्रह धरला; सामान्य उतारू ह्या दृष्टीनें स्वतः-जवळील ज्या जिनसा दाखविल्या पाहिजेत, त्या दाखविल्या. तथापि, आंतरराष्ट्रीय आरोग्यनियमांप्रमाणें आवश्यक तो देवी व कॉलरा इनॉक्युलेशनचा दाखला त्यांचेजवळ नव्हता. इनॉक्युलेशनला त्यांची संमति नसल्यानें त्यांनीं ज्या ज्या देशांत प्रवास करावयाचा, त्या त्या देशांकडून ह्या बाबतींत माफी मिळविली आहे!

## ला. इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या भांडवलाची गुंतवणूक

### सरकारचें नोटिफिकेशन

"अर्था"च्या दि. ६ ऑगस्टच्या अंकांत, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे फंड कसे गुंतविले जावे, ह्याविषयीं लेख प्रसिद्ध झाला होता. जुन्या २७ अ ह्या कलमाप्रमाणें सरकारनें कांहीं बंधनें घालण्याची आवश्यकता त्यांत प्रतिपादलेली होती. विमा कायद्यांतील कांहीं विशिष्ट तरतुदी लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनला लागू करणारें एक नोटिफिकेशन सरकारनें आतां काढलें आहे. या नोटिफिकेशन अन्वयें, दुरुस्त करण्यांत आलेल्या विमा कायद्याच्या कलमांत त्या कायद्याचें २७ अ हें एक कलम आहे. मूळ कलमांत या नोटिफिकेशनअन्वयें करण्यांत आलेल्या दुरुस्तीनुसार लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचें भांडवल गुंतवणुकीबाबत अवलंबावयाचें धोरण नमूद केलेलें आहे. २७ अ कलमांतील तरतुदी ठेवण्यास तशींच कारणें आहेत. या कलमान्वयें देण्यांत आलेलें स्वातंत्र्य आणि घातलेले निर्बंध हे अनुभवानें योग्य ठरलेले आहेत.

एकंदरींत हें कलम विमेदार आणि विमा कंपन्या या दोघांच्याहि दृष्टीनें समाधानकारक ठरलें असल्यामुळें, पूर्वीच्या अनेक कंपन्यांच्या ऐवजीं एकच कॉर्पोरेशन अस्तित्वांत आल्यामुळें अगदीं आवश्यक तेवढ्याच दुरुस्त्या सदर कलमांत करण्यांत आल्या आहेत.

### भांडवल गुंतवणुकीचे तीन स्थूल भाग

नवीन व्यवस्थेनुसार इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या भांडवल गुंतवणुकीचे पुढीलप्रमाणें तीन भाग राहतील :—पहिला म्हणजे सरकारी आणि सरकारमान्य रोखे, दुसरा भाग म्हणजे खुद्द या कलमान्वयें मान्यता दिलेले रोखे आणि तिसरा भाग म्हणजे इतर गुंतवणुकीच्या एकूण निधीपैकी ५० टक्के रक्कम सरकारी व सरकारमान्य रोख्यांत आणि १५ टक्क्यांपर्यंत भांडवल इतर स्वरूपांत गुंतविण्यांत यावें अशा मर्यादा आहेत. यामुळें सरकारमान्य रोख्यांत सुमारें ३५ टक्के रक्कम गुंतविली जाते.

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें आपले व्यवहार करतांना लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ॲक्टाचें ६ (१) कलम सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे. या कलमान्वयें, आपला कारभार एकंदर समाजाच्या हिताच्या दृष्टीनें चालविणें कॉर्पोरेशनवर बंधनकारक आहे. अधिक स्पष्टपणें सांगावयाचें तर कॉर्पोरेशननें ही गोष्ट सदैव लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ज्यांचा पैसा कॉर्पोरेशनकडे विश्वासानें ठेवलेला आहे त्या विमेदारांच्या हिताची जपणूक करणें हें त्याचें प्राथमिक कर्तव्य आहे. तसेंच कॉर्पोरेशननें आपले व्यवहार शक्यतों व्यापारी तत्त्वांवर चालवावयाचे आहेत. म्हणून कॉर्पोरेशन कधींहि पक्षपाती दृष्टिकोन स्वीकारणार नाहीं.

### स्टॉक मार्केटांतील चढ–उतार

स्टॉक मार्केटबाबत लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें कोणतें धोरण ठेवावें याबद्दल सांगावयाचें, तर कॉर्पोरेशननें वायदे बाजारांत सट्टेबाजीच्या आहारीं जाऊन बाजारांतील किंमतीच्या तात्पुरत्या चढउतारांचा फायदा करून घ्यावा असा मानस मुळींच नाहीं. या कॉर्पोरेशननें दूर दृष्टीनेंच भांडवल गुंतविलें पाहिजे. मात्र त्याचबरोबर परिस्थिति तशीच आल्यास शेअरच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यास त्याला प्रतिबंध नाहीं. ही संस्था भांडवल गुंतवणुकीबाबत वेळोवेळीं विचार करून आपल्या शेअरांच्या बाबतींत ते ठेवण्याच्या, विकून टाकण्याच्या किंवा त्यांच्यांत भर घालण्याच्या दृष्टीनें योग्यायोग्य विचार करील. उदाहरणार्थ, तेजीच्या काळांत शेअर विकण्याच्या आणि मंदीच्या काळांत खरेदी करण्याच्या व्यवहारानें केवळ या कॉर्पोरेशनचा फायदा होईल एवढेंच नव्हे, तर स्टॉक मार्केटमधील चढउतारांत समतोलपणा येऊन राष्ट्रीय हितहि साधलें जाईल.

जरूर त्या दुरुस्त्या करून आणि योग्य वाटेल त्या परिस्थितींत लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनला लागू करण्याचें बंधन सरकारवर असलेली २७ अ कलमान्यतिरिक्त इतर कांहीं कलमें आहेत. हीं कलमें कंट्रोलर ऑफ इन्शुरन्स यांजकडे कांहीं विशिष्ट पत्रकें सादर करण्यासंबंधींचीं आहेत. विमेदारांचे हितसंबंध निर्धोक राहावेत यासाठीं हीं पत्रकें सादर करावयाचीं असतात. या तरतुदी हितावह आहेत; लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें हीं पत्रकें सादर करीत जावींत व संबंधित कलमें त्यांस लागू असावींत, ही गोष्टहि अत्यंत काळजीपूर्वक विचारांत घेण्यांत आली असून, केलेल्या दुरुस्त्या किरकोळ स्वरूपाच्या आहेत.

भांडवल गुंतवणुकीच्या धोरणाबद्दल मागील काळांत मांडण्यांत आलेल्या सर्व मुद्यांचा विचार करून त्या बाबतचें धोरण ठरविण्यांत आलें आहे.

---

## दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

गेल्या सहकारी वर्षांत १७७ नवीन सभासद झाले. गेल्या तेरा वर्षांतील हा उच्चांक आहे. ४९ सभासदांचें सभासदत्व कमी होऊन वृत्तांतवर्षाखेरीस १०७५ सभासदसंख्या आहे. खपलेल्या भांडवलांत या सहकारी वर्षांत १४,५०० रुपयांची भर पडून तें २,०५,३०० रु. झालें. त्याचप्रमाणें, वसूल भांडवलांतहि रु. ९,४२० वाढ झाली असून वृत्तांतवर्षाचे अखेरीस तें रु. १,३३,५०० झालें आहे.

या सहकारी वर्षांत ठेवींची एकूण रक्कम रु. ३६,५०० नीं वाढली आहे, व ती ८,२३,०६० रु. झाली आहे. मुख्यतः ही वाढ मुदत ठेवीमध्यें झालेली आहे. इतर ठेवी थोड्याशा घटल्यासारख्या दिसतात.

या सहकारी वर्षाचे सुरवातीस थकबाकी रु. ७८,१८४ होती, ती या वर्षाखेरीस रु. ६८,९६३ राहिली आहे. थकबाकीचें एकूण कर्जाशीं शेंकडा प्रमाण १३·६ असून तें गतवर्षापेक्षा २·४ नें कमी आहे. नफा ६,९२७ रु. झाला असून ३% दरानें डिव्हिडंड मिळणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पुणें म्यु. कॉर्पोरेशन सर्व्हंटस को. अर्बन बँक लि.

**श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भेटीच्या वेळीं भाषण**

अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग संघाचे अध्यक्ष मा. वैकुंठभाई मेहता यांनीं दि पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हन्टस को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें या संस्थेस दि. २८–८–५८ रोजीं भेट दिली. समारंभाचे सुरवातीस बँकेचे अध्यक्ष श्री. सि. धों. आवनावे यांनीं बँकेची गेल्या ४५ वर्षांत झालेली प्रगति व आज बँकेचा वाढलेला कार्याचा व्याप यासंबंधीं सविस्तर माहिती पाहुण्यांना निवेदन केली. बँकेचे एक कार्यकर्ते श्री. व. रा. कोतवाल यांनीं जागेसंबंधी बँकेपुढें असलेली अडचण मांडली. कॉर्पोरेशनला नॉमिनल किंमतीस अगर अल्प भाड्यांत बँकेस जागा देतां येत नाहीं, अशा तऱ्हेची कायदेशीर अडचण उपस्थित झाल्याचें सांगितलें. तसेंच बँकेचा इमारत निधि वाढविणे संबंधीं आखलेली योजनाहि समजावून सांगितली. उत्तरादाखल श्री. वैकुंठभाई मेहता यांनीं भाषण केलें व बँकेची प्रगति फारच समाधानकारक असल्याचें सांगितलें. तसेंच सोन्याचे तारणावर सभासदांना कर्ज देण्याची व्यवस्था व्हावी असेंहि सुचविलें. नाममात्र भाड्यानें अगर अल्प किंमतींत जागा देणें कॉर्पोरेशनला कायद्यानें शक्य नसलें तरी कॉर्पोरेशन कायद्यांत नौकरवर्गासाठी कल्याणकारी योजना (वेल्फेअर स्कीम्स) आखण्याची तरतूद आहे, ती महानगरपालिकेच्या नजरेस आणावी असें सांगितलें. मुंबई कॉर्पोरेशनमध्यें, तसेंच रेल्वेमध्यें अगर इतर अनेक संस्थांमध्यें नौकरवर्गासाठी बऱ्याच सोयी करण्यांत येतात. कॉर्पोरेशननें आपल्या नवीन इमारतीमध्यें वरील धोरणानुसार बँकेसाठी जागेची सोय करावी अगर रिकाम्या होणाऱ्या जुन्या इमारतीमध्यें बँकेस जागा द्यावी, असेंहि त्यांनीं सुचविलें. काटकसर फंडाच्या रूपानें सभासदांच्या ठेवीची बरीच मोठी रक्कम जमा असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. तसेंच सहकारी बँकेचें भांडवल जरी लहान असलें तरी राष्ट्र रचनेच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व कोटयावधि रु. भांडवल असलेल्या बँकांच्यापेक्षा कमी आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण, सहकारी बँका अल्प प्राप्तीच्या लोकांच्या अडीअडचणी निवारण करतात; मोठ्या बँकांना या कार्याकडे लक्ष पुरविणें शक्य नसतें.

यानंतर बँकेचे एक कार्यकर्ते श्री. भि. वि. पाटील यांनीं पाहुण्यांचे आभार मानून इतर उपस्थित सभासदांचेहि आभार मानले.

### एकूण ६० कोटी रुपयांचीं दोन नवीं कर्जे

भांडवल गुंतविणाऱ्या संस्थांची आणि एकंदरींत नाणें बाजाराची सततची मागणी लक्षांत घेऊन, भारत सरकारनें ३॥ टक्के दराचें १९६८ मध्यें परतफेड करण्याचें ३० कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. हे कर्जरोखे, शें. ९८·५ दरानें विकण्यांत येतील. त्याचप्रमाणें ३॥ टक्के दराचे १९६७ च्या मुदतीचे ३० कोटी रु. चे नॅशनल प्लॅन बॉण्ड तिसरी माला शें. ९८·८० दरानें विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. हें सर्व कर्ज प्रथमतः रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्वतःच विकत घेणार असून मागाहून नेहमीच्या पद्धतीनें ते रोखे विकत मिळूं शकतील. विक्रीचा दर बँकेकडून कळूं शकेल.

### मुंबई राज्य सहकारी परिषद

मुंबई राज्य सहकारी परिषदेचें २३ वें अधिवेशन नागपूर येथें ७ व ८ नोव्हेंबर रोजीं भरण्याचें ठरलें होतें. त्याऐवजीं तें आतां नागपूर येथेंच १५, १६ व १७ नोव्हेंबर रोजीं भरेल.

## दि पेण को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड., पेण

अहवालाच्या सालीं बँकेनें एकंदर रुपये २९,१३,६९८ ची उलाढाल केली. गुदस्त सालापेक्षा उलाढाल रु. ३,११,४०८ नें जास्त आहे. अहवालाच्या सालांत बँकेनें रु. ११,५८६=१५ नये पैसे निव्वळ नफा केला. गुदस्त सालचा नफा व चालू सालाच्या एकंदर उलाढालीवरून नफ्याचें प्रमाण कमी दिसेल त्याला कारण म्हणजे व्यवस्थापक मंडळानें ठेवीदार व सभासद यांना ठेवी व कर्जांवरील व्याजाच्या दरामध्यें दिलेला फायदा. सभासदांच्या कर्जखातेवरील व्याजाच्या दरामध्यें वाढ न करतां, ठेवीदार व सभासदांचे ठेवीवरील व्याजाच्या दरामध्यें अर्धा टक्क्यानीं वाढ दिली.

अहवालाच्या सालांत ठेवीमध्यें समाधानकारक वाढ आहे. सेव्हिंग व मुदतबंद खात्यांत उल्लेखनीय अशी वाढ आहे. कर्जाच्या बाबतींत सभासदांनीं बँकेकडून मिळणाऱ्या सवलतीचा संपूर्ण फायदा घेतला आहे. कारण, अहवालाच्या सालांत कर्ज देण्यांची कमाल मर्यादा पूर्ण झाली आहे व कर्जाची मागणी येतच आहे. त्याकरितां पोटनियम ३६ मध्यें दुरुस्ती सुचवून कमाल मर्यादेमध्यें वाढ करण्याची शिफारस व्यवस्थापक मंडळ करीत आहे. अहवालाच्या सालांत शेअर भांडवलामध्यें रु. ६,४२५ नें वाढ झाली आहे. आतां खपलेलें भांडवल रु. ५६,४२५ आहे.

ता. ३०–६–१९५८ अखेर एकूण मंजूर कर्ज रु. ३,३६,३१९ आहे. मंजूर कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण ५·५५ टक्के पडतें व येणें मुद्दल थकबाकीचें प्रमाण ४ टक्के पडतें. बँकेनें ऑडीट क्लास "अ" कायम राखलेला आहे.

### दि नासिक पीपल्स को. बँक लि. चा ३५ वा वाढदिवस

बँकेचा ३५ वा वाढदिवस ता. २८–८–५८ रोजीं सायंकाळीं ७–३० ला नगरपालिकेंत मुंबई राज्याचे सहकारमंत्री श्री. बाळासाहेब भारदे यांचे अध्यक्षतेखालीं साजरा केला. प्रथम श्री. भ. गो. नांदुर्डीकर यांनीं स्वतः सहकारी गीत रचून गाउन दाखविलें. नंतर चेअरमन डॉ. म. ग. पाठक यांनीं अध्यक्षांचें स्वागत करून त्यांची ओळख करून दिली. मॅनेजिंग डायरेक्टर सौ. कमलिनी टोणगांवकर यांनीं निवेदन केलें. श्री. मा. कृ. लेले यांनीं संदेश वाचन केलें. डॉ. य. स. शुक्ल यांनीं व श्री. वाघमारे यांनीं बँकेची उपयुक्तता पटवून दिली. नंतर माननीय बाळासाहेबांनीं सहकाराची जरूरी, व सहकारी तत्त्व हें इतर अमेरिका, रशियासारख्या देशांशीं तुलना करून भारतांतील सुशिक्षित समाजानें आत्मसात् करून प्रचारास येण्याबद्दल आव्हान दिलें. त्या प्रसंगीं प्रमोटरपैकीं हयात व उपस्थित असलेले श्री. विष्णु लक्ष्मण धारपुरे यांचा सत्कार केला.

सौ. टोणगांवकर यांनीं आभार मानल्यानंतर कार्यक्रम संपला.

माननीय मंत्री यांनीं संस्थेस भेट देऊन डायरेक्टर व प्रतिष्ठित हितचिंतकांबरोबर चर्चा केली.

### विद्यापीठें व कॉलेजें ह्यांच्या सुट्ट्यांत कपात

विद्यापीठें व कॉलेजें ह्यांतील सुट्ट्यांची संख्या कमी करून, वर्षांतून १८० दिवस तरी ज्ञानदान चालू राहील, अशी योजना करण्यांत येत आहे. परीक्षेकरितां खर्च होणाऱ्या दिवसांचा ह्या १८० दिवसांत समावेश होणार नाहीं. विद्यार्थ्यांना त्यांच्या फींचा अधिक चांगला मोबदला मिळून अधिक चांगली शिस्त राखली जाईल, अशी अपेक्षा आहे.

## मुंबई राज्यांतील सहकारी कारखाने

मुंबई राज्यांत सहकारी कारखान्यांची प्रगति होत आहे, तिला मुंबई राज्य सहकारी बँक व तिचे संचालक ह्यांचें महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व सहाय्य होत आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. वा. पुं. वर्दे ह्यांना ह्या सहकारी कारखान्यांच्या स्थापनेचें व वाढीचें बहुंशीं श्रेय दिलें पाहिजे. बँकेच्या १९५६–५७ च्या वार्षिक कारभाराविषयक अहवालांत सहकारी साखर कारखान्यांचा घेतलेला परामर्ष उद्बोधक आहे.

लोणी बुद्रुक येथील पहिल्या सहकारी साखर कारखान्याच्या यशामुळें प्रोत्साहन मिळून, मुंबई सरकारनें सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेचा एक कार्यक्रमच आंखला. ह्या कारखान्यांची उभारणी व व्यवस्था उंसाच्या बागाइतदारांनींच करावी, अशी योजना होती. १९५६–५७ मध्यें सहकारी कारखान्यासाठीं नोंदलेल्या सोसायट्यांत वाढ होऊं शकली नाहीं; कारण परदेशी चलनाच्या तुटवड्याची अडचण होती. लोणी बुद्रुक आणि कोपरगांव येथील कारखान्यांतून आधींच उत्पादन सुरू झालें होतें. १९५६–५७ मध्यें सात कारखाने साखर तयार करूं लागतील अशी अपेक्षा होती; पण फक्त दोनच ( सणसर व बावेन ) कारखाने सीझन साधूं शकले. कारण, सणसरनें प्रवराची जुनी यंत्रसामुग्री मिळविली आणि बाबेनची सर्व यंत्रसामुग्री सुएझ प्रकरणापूर्वीच येऊन दाखल झाली. राहुरी, रहाता, कारेगांव, फलटण आणि माळेगांव ( पुणें ) ह्यांना वेळेवर यंत्रसामुग्री मिळूं शकली नाहीं व त्यांना १९५७–५८ मध्यें प्रारंभ करतां आला.

माळेगांव ( नाशिक ) ची एक, कोल्हापूरच्या तीन, सांगलीची एक, आणि कोडिनारची एक, अशा सहा कारखान्यांना सरकारी आयातीच्या धोरणाप्रमाणें, आयात करावयाच्या यंत्रांच्या परदेशी देण्यांची व्यवस्था करावी लागली. त्यांना यंत्रसामुग्रीची उभारणी करण्यास सहाजिकच वेळ लागला; त्यांना १९५८–५९ चा मोसम मिळूं शकेल. रेठरे व गणदेवी कारखान्यांना फॅक्टरीचा परवाना मिळाला, पण यंत्रसामुग्रीच्या आयातीचा परवाना मिळाला नाहीं; त्यामुळें त्यांचा कार्यक्रम स्थगित झाला. बिद्री ( कोल्हापूर ) येथें सहकारी साखर कारखान्यासाठी सोसायटी नोंदली गेली पण तिला फॅक्टरीचाहि परवाना मिळाला नाहीं.

उसाच्या बागाइतदारांनीं स्वतःचे सहकारी कारखाने उभारले असें म्हणण्यांत आलें, तरी वस्तुतः ते सरकारी कारखाने असल्यासारखेच आहेत, अशी टीकाकारांची टीका आहे. सरकारनें प्रत्येक कारखान्याचे १० लक्ष रुपयांचे भाग घेतले आहेत हें खरें आहे; पण: "हें भाग भांडवल वगळलें, तर उरलेल्यापैकी ९२% भागभांडवल उसकऱ्यांचेंच आहे; पंजाबांत त्याचें प्रमाण ५०% पेक्षा कमी आहे." असें सर माल्कम डार्लिंग ह्यांनीं म्हटलें आहे. कारखान्यांना यंत्रांच्यासाठी उभाराव्या लागणाऱ्या कर्जाला सरकार गॅरंटी राहिलें, हेंहि सरकारच्या इतर उद्योगधंद्यांबाबत धोरणाशीं विसंगत नाहीं. सरकारनें व्यवस्थापकमंडळावर प्रतिनिधी पाठविलें हेंहि अशाच प्रकारच्या धोरणाचा भाग आहे. प्रत्येक कारखान्याच्या बोर्डावर उत्पादक सभासदांचे व सामान्य सभासदांचे प्रतिनिधी असतात त्याचप्रमाणें सरकारचे दोन, इं. फि. कॉर्पोरेशनचे दोन, रजिस्ट्रारचा एक, कर्ज देणाऱ्या बँकेचा एक, दोन तज्ज्ञ, अशांची नेमणूक झालेली असते.

कारखान्यांचा दैनंदिन कारभार सोसायटीचे मॅनेजिंग डायरेक्टर व बोर्ड ह्यांकडे असतो. योग्य धोरण आंखून सर्व कारखान्यांचे बाबतींत एकवाक्यता राखण्यासाठी खास जॉइंट रजिस्ट्रार सल्ला देतात. नियोजित प्रगति घडवून आणण्यासाठी अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालीं मंत्र्यांची समिति काम करते. प्रा. गाडगीळ व श्री. वर्दे ह्या समितीवर बिगर–सरकारी सभासद म्हणून काम करीत होते. सहकारी कारखान्यांचें १९५६ मध्यें एक फेडरेशन करण्यांत आलें, त्याचे प्रा. गाडगीळ हे अध्यक्ष व श्री. वर्दे हे सभासद होते. यंत्रसामुग्रीची खरेदी, मशिनरीची उभारणी, नोकरवर्गाची नेमणूक व त्याचें शिक्षण, स्टोअर्सची एकत्र खरेदी, साखरेची विक्री, इत्यादि बाबतींत फेडरेशननें महत्त्वाची कामगिरी केली.

प्रारंभीं नमूद केलेल्या अठरा कारखान्यांपैकी तीन कारखान्यांना कर्जपुरवठा करण्याचा प्रश्नच उभा राहिला नाहीं. कारण, दोघांना फॅक्टरी उभारण्याचा परवाना मिळूं शकला नाहीं व एका कारखान्यानें आपल्या भांडवलांतून प्राथमिक उभारणी केली; आयातच्या परवान्याची तो वाट पहात होता. बाबेनच्या कारखान्याला सुरत सेंट्रल को. बँकेनें आणि माळेगांवच्या कारखान्याला पुणें सेंट्रल को. बँकेनें कर्जपुरवठा केला. बाकीच्या बारा कारखान्यांची सोय मुंबई राज्य सहकारी बँकेनें केली. कारखान्यांना मूळ अंदाजापेक्षा ज्यास्त रकमांची गरज लागली, ती भागविणें बँकेला भाग पडलें.

मुंबई राज्यांतील सहकारी कारखान्यांना अधिकाधिक कॅश क्रेडिट पुरविण्याची जबाबदारी मुंबई राज्य बँकेवर पडणार आहे. इं. फि. कॉर्पोरेशनचें कर्ज हातीं येण्या आधीं कारखान्यांना कर्ज द्यावें लागतें. त्यासाठी सरकारी गॅरंटीनें स्टेट बँकेकडून २ कोटि रुपयांपर्यंत कर्ज मिळविण्याची व्यवस्था करावी लागली आहे. साखरेच्या तारणावरील प्रॉ. नोटा डिस्कौंट करण्याची व्यवस्थाहि करावी लागेल.

सहकारी साखर कारखान्यांची संख्या, त्यांची उत्पादनक्षमता, त्यांचे उत्पादक सभासद व सभासदांच्या जवळील जमिनींतील ऊंस, ह्याची कल्पना खालील तक्त्यावरून येईल. :—

### सहकारी साखर कारखाने

| | कारखान्यांची संख्या | उत्पादनक्षमता ( टन ) | उत्पादक सभासद | सभासदांचा ऊंस ( एकर ) |
|---|---|---|---|---|
| १९५६–५७ पूर्वी चालू असलेले कारखाने | २ | २,००० | १,८१९ | ७,०३९ |
| १९५६–५७ मध्यें सुरू झालेले कारखाने | २ | १,३०० | १,८९६ | २,७०० |
| १९५७–५८ मध्यें सुरू झालेले कारखाने | ५ | ४,८०० | ४,९५९ | १५,९५२ |
| १९५८–५९ मध्यें सुरू होणारे कारखाने | ६ | ६,००० | ७,९९२ | १६,९७५ |
| फॅक्टरीचा परवाना मिळालेले पण आयातीचा परवाना न मिळालेले कारखाने | २ | — | २,६९० | ५,७०० |
| स्थापन होत असलेले कारखाने | १ | — | १,३३६ | ३,७३५ |
| एकूण | १८ | १४,१०० | २०,६९२ | ५२,१०१ |

## कुळाच्या त्यागपत्राचे परिणाम त्याला समजावून सांगितले पाहिजेत

### मुंबई रेव्हेन्यू ट्रिब्यूनलचा निवाडा

शिवराम दामोदर वैसास या इसमाच्या मालकीची श्रीवर्धन येथें २७ गुंठे जमीन होती. धोंडू हरि चचाले हा त्या जमिनीचा कुळ होता. ता. २५ ऑक्टोबर १९५६ रोजीं वैसास यांनीं महालकऱ्यास अर्ज करून त्यास कळविलें कीं, कुळानें खुषीनें त्यागपत्र ( Surrender ) दिलें असून पुढें ती जमीन तो कसणार नसल्यामुळें जमिनीचा ताबा आपणांस मिळावा. त्या अर्जाबरोबरच धोंडू हरि चचाले यानेंहि महालकऱ्याला अर्ज करून कळविलें कीं, आपण स्वखुषीनें त्यागपत्र दिलें असून भावी काळांत ती जमीन आपणांस कसणें शक्य होणार नाहीं आणि म्हणून आपल्या त्यागपत्रास संमति मिळावी. महालकऱ्यानें हे दोन्हीहि अर्ज दाखल करून घेतले. ता. २२ नोव्हेंबर १९५६ रोजीं त्यानें मालक आणि कुळ या दोघांचेंहि म्हणणें काय आहे तें लिहून घेतलें. कुळाचें म्हणणें असें होतें कीं, यापुढें आपणांस नोकरी करावयाची असल्यामुळें आपण त्यागपत्र देत आहों. कुळानें त्यागपत्र दिलें आहे आणि तें स्वखुषीनें दिलें असल्यामुळें जमिनीचा ताबा वैसास यांना मिळावा, असा हुकूम महालकऱ्यानें दिला.

या हुकूमाविरुद्ध चचाले यांनीं प्रांत अधिकाऱ्याकडे अपील केलें. आपण दिलेलें त्यागपत्र आपणांकडून लबाडीनें आणि दिशाभूल करून लिहून घेतलें असल्यामुळें तें रद्द करावें असें चचाले यांचें म्हणणें होतें. कुळाकडून योग्य त्यागपत्र लिहून घेतलें नसल्यामुळें तें त्यागपत्र बेकायदा आहे असा निकाल देऊन प्रांत अधिकाऱ्यानें महालकऱ्याचा हुकूम रद्द केला आणि जमिनीचा ताबा पुन्हा कुळाला दिला. यावर वैसास यांनीं मुंबई रेव्हिन्यू ट्रायब्यूनलकडे रिव्हिजन अर्ज केला.

ट्रायब्युनलपुढे अर्जदार वैसास यांचें म्हणणें असें होतें कीं, त्यागपत्राला संमति देतांना महालकऱ्यानें मुंबईचा कुळ कायदा आणि त्याखालील नियम यांचें पालन केलें असल्यामुळें त्यागपत्राची आवश्यकता होती हें प्रांत अधिकाऱ्याचें मत चुकीचें होतें.

१९५६ सालच्या कायद्यानें सुधारणा केलेल्या मुंबईच्या कुळ कायद्याच्या क. १५ ( १ ) चा आशय असा आहे कीं, कुळाला जर जमीन वहावयाची नसेल तर तो जमीन सोडूं शकतो. मात्र हें त्यागपत्र लेखी असून कुळ कायद्याखालीं केलेल्या नियमाप्रमाणें असलें पाहिजे. प्रस्तुत केसमध्यें जमिनीचा त्याग करण्यासंबंधीचा अर्ज चचाले यांनीं ज्या दिवशीं महालकऱ्याला केला त्या वेळेस नियम ९ अंमलांत आला नव्हता. तो नियम ता. १८ डिसेंबर १९५६ रोजीं अंमलांत आला. त्याअगोदर १९४९ च्या नियमांपैकीं नियम २-अ अंमलांत होता.

अर्जदार वैसास यांच्यातर्फे ट्रायब्यूनलपुढें असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, नियम २-अ मध्यें जुन्या क. ५ चा उल्लेख आहे आणि क. ५ हें १९५६ च्या १३ व्या कायद्यानें रद्द झालें असल्यामुळें प्रस्तुत केसला नियम २-अ लागू होणार नाहीं.

हा युक्तिवाद ट्रायब्यूनलला पटला नाहीं. १९५६ च्या १३ व्या कायद्यानें जरी क. ५ रद्द झालें असलें तरी त्या कलमाऐवजीं क. १५ झालें आहे. तेव्हां मुंबई जनरल क्लॉजेस कायद्याच्या क. ९ खालीं जेथें क. ५ चा उल्लेख असेल तेथें तो उल्लेख क. १५ चा आहे असें समजलें पाहिजे.

प्रस्तुत केसमध्यें नियम २-अ आणि क. १५ हें महालकऱ्याकडून पाळले गेलें किंवा नाहीं हें आपणांस पहावयाचें आहे. कुळानें जेव्हां त्यागपत्र दिलें. तेव्हां महालकऱ्यानें मालक आणि कुळ यांचें म्हणणें लिहून घेतलें. त्यागपत्राचे परिणाम काय होतील हें महालकऱ्यानें कुळाला समजावून सांगितलें नाहीं. अशा तऱ्हेच्या मामल्यांत योग्य चौकशी झाली पाहिजे आणि त्यागपत्राचे परिणाम काय होतील हें कुळाला नीट समजावून सांगितले पाहिजे. प्रस्तुत केसमध्यें एका महत्त्वाच्या गोष्टीकडे महालकऱ्यानें कानाडोळा केला. १९५६ च्या १३ व्या कायद्यानें सुधारणा केलेल्या मुंबईच्या कुळ कायद्याच्या क. ३२ खालीं जमिनीची किंमत आपणांस सोयीच्या शर्तीवर देऊन मालक बनण्याचा हक्क कुळाला प्राप्त झाला होता. या हक्काची जाणीव महालकऱ्यानें कुळाला करून दिली नाहीं. आपण खंड देण्यास असमर्थ आहों असें कुळानें केव्हांच म्हटलें नव्हतें. तसेंच खंड थकला होता अशीहि वस्तुस्थिति नव्हती. आपणांस नोकरी करावयाची असल्यामुळें आपण त्यागपत्र देत आहों हें कुळाचें म्हणणें लिहून घेऊन केवळ त्या आधारावर महालकऱ्यानें त्यागपत्राला संमति दिली. अशा परिस्थितींत नियम २-अ चें पालन महालकऱ्यानें केलें असें म्हणतां येणार नाहीं आणि त्यागपत्र बेकायदा समजलें जावें असा निकाल देऊन ट्रायब्यूनलनें प्रांत अधिकाऱ्याचा निर्णय कायम केला आणि रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

मुंबई कुळ कायद्याखालीं कुळानें आपल्या ताब्यांत असलेल्या जमिनीचे आपल्या मालकाच्या नांवानें त्यागपत्र ( Surrender ) करून दिलें तर तें स्वखुषीनें आहे किंवा काय याची योग्य चौकशी महालकऱ्यानें केली पाहिजे. त्यागपत्राचे परिणाम काय होतील हें महालकऱ्यानें कुळाला समजावून सांगितलें पाहिजे. त्यागपत्राचे परिणाम कुळाला समजावून न सांगतां आणि सोयीच्या हप्त्यांनीं जमिनीची किंमत देऊन त्याला मालक बनतां येते. या हक्काची जाणीव त्याला करून न देतां केवळ आपणांस नोकरी करावयाची असल्यामुळें आपण त्यागपत्र देत आहों हें कुळाचें म्हणणें लिहून घेऊन जर त्या त्यागपत्रास महालकऱ्यानें संमति दिली तर तें बेकायदा ठरेल आणि त्यागपत्र रद्द ठरूं शकेल.

—न्यायबोध, ऑगस्ट, १९५८

---

**माथेरानच्या रेल्वेरस्त्याची दुरुस्ती**—नेरळपासून माथेरानला जाणाऱ्या छोट्या रेल्वेचा रस्ता पावसाच्या वर्षावानें नादुरुस्त झाला होता. तो दुरुस्त करण्याचें काम १,००० मजुरांच्या मदतीनें तांतडीनें करण्यांत येत आहे. खुद्द माथेरानला वादळाचाहि तडाखा बसला आहे. रेल्वेरस्ता बहुधा सप्टेंबर अखेरीस वाहतुकीस खुला होईल.

**नवीन आय. ए. एस. अधिकारी**—पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या कालावधींत नवीन आय. ए. एस्. अधिकाऱ्यांची खास भरती करण्यांत येण्याचा संभव नाहीं अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. त्याचप्रमाणें १९५९ ते १९६३ ह्या काळांत ४५ आय. सी. एस्. अधिकारी व १२० आय. ए. एस्. अधिकारी सेवानिवृत्त होतील, असेंहि सांगण्यांत आलें.

हे पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.